**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ०३ /०२/२०२०

प्रति,
मा. ---------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समिती **सभा क्र -०९ गुरूवार दि. ०६/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वा.** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**गुरूवार दिनांक - ०६/०२/२०२० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १४८ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १४९ | अहमदनगर महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर पाणीपटटीचे दरात वाढ करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट . |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत- विषय क्रमांक- १४८ ते १४९ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र.९**

विषय क्रमांक- १४८ गुरूवार दि.०६/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.६१२ दि.१८/१२/२०१९ चा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.६१२ दि.१८/१२/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै. बाहासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.१७/०७/२०१९ ते १६/०१/२०२० अखेर असुन सदरची मुदत ही दि.१७/०१/२०२० रोजी पासुन समाप्त होणार असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि.२०/०१/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र. २३ दि.२७/०६/२०१९ च्या पुर्व मान्यता पारित ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक १५४२ दि.०५/०८/२०१९ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांची रू.२८०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.१७/०७/२०१९ पासून सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि.१७/०१/२०२० रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २०/०१/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २८,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्य लेखाधिकरी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे सहा.आायुक्त, आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील नियम ५३(३) मध्ये आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्वमंजुरी वाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि [लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन नसलेल्या ] कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. असे नमुद आहे उक्त तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास मान्यतेस्तव

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, वैद्यकीय अधिकारी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देउन दि.२०/०१/२०२० पासून पुर्ननियुक्ती देवुन रू.२८,०००/- दरमहा मानधनाचा ६ महिन्याकरिताचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

****

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. सुभाष लोंढे :- डॉ. राजूरकर या डॉक्टराची आवश्यक्ता आहे का ? त्यांचे काम कसे आहे.

आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :- आवश्यक्ता आहे. त्यांचे काम समाधान कारक आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- महानगरपालिकेची ब्लड बॅक इतक्या वर्षा पासून चालू आहे.मग आत्ताच का इतकी दुरावस्था झाली.

वैदयकीय आरोग्य अधिकारी :- रक्त संकलन करीता कॉम्प घेण्यात आलेले नाही.या करिता लागणारे कीट व इतर साहित्य उपलब्ध नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- रक्तपेढीमधील सर्व स्टाफ पुढच्या स्थायी समितीच्या बैठकीच्यावेळी बोलवा.नेमक्या काय समस्या आहेत ते सर्वाना समजेल.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढीमधील सर्व स्टाफ पुढच्या स्थायी समितीच्या बैठकीच्यावेळी बोलवा.

मा.प्रकल्प विभाग प्रमुख :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) अंतर्गत शौचालयांच्या सेप्टीक टॅक मधील मैल्याचे सुरक्षित नियमित व्यवस्थापन करून त्यावर प्रक्रिया करणेसाठी मैला प्रक्रिया केंद्र (FSTP) बांधणे बाबतचे देयक अदा करणे बाबत केलेल्या संविदची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतच्या ऑफिस रिपोर्टस मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- या बाबत सविस्तर माहिती सांगा.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) अंतर्गत शौचालयांच्या सेप्टीक टॅक मधील मैल्याचे सुरक्षित नियमित व्यवस्थापन करून त्यावर प्रक्रिया करणेसाठी मैला प्रक्रिया केंद्र (FSTP) बांधणे बाबत ग्लोबल एन्विरोस,पनवेल,नवी मुंबई या एजन्सीस प्रकल्प विभागा कडून कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.सदर बाबत एकुण निविदा रक्कम रू.२४,९४,०९२/-इतकी असल्याने मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता घेवून कार्यारंभ आदेश देण्यात आला.मा.शासनाचे पत्र क्र.राअस/ODF++/६४५/१९-२० दिनांक ८ नोव्हेंबर २०१९ अन्वये देयक रू.२४,९४,०९२/- + जीएसटी १२ % रू.२,९९,२८१/- = २७,९३,२९४/- इतकी होत आहे.

सदर बाबतचा विषय स्थायी समितीच्या अवलोकनांर्थ घेण्यात यावा.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.व प्रकल्प विभाग प्रमुख यांनी सभेमध्ये सादर केलेल्या विषयाबाबतच्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतच्या ऑफिस रिपोर्टस मान्यता देण्यात यावी.

मा.सौ.आशा कराळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. प्रकल्प विभागाची संविदा मंजूर करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) अंतर्गत शौचालयांच्या सेप्टीक टॅक मधील मैल्याचे सुरक्षित नियमित व्यवस्थापन करून त्यावर प्रक्रिया करणेसाठी मैला प्रक्रिया केंद्र (FSTP) बांधणे बाबत ग्लोबल एन्व्हिरोस,पनवेल,नवी मुंबई या एजन्सीस प्रकल्प विभागा कडून कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.सदर बाबत एकुण निविदा रक्कम रू.२४,९४,०९२/-इतकी असल्याने मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता घेवून कार्यारंभ आदेश देण्यात आला.मा.शासनाचे पत्र क्र.राअस/ODF++/६४५/१९-२० दिनांक ८ नोव्हेंबर २०१९ अन्वये देयक रू.२४,९४,०९२/- + जीएसटी १२ % रू.२,९९,२८१/- = २७,९३,२९४/- इतक्या खर्चाच्या केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतच्या ऑफिस रिपोर्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. रेणुका प्रणव जोशी यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

सभेमध्ये विभागाने दिलेल्या माहिती व त्याअनुषंगाने झालेल्या चर्चेनुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) अंतर्गत शौचालयांच्या सेप्टीक टॅक मधील मैल्याचे सुरक्षित नियमित व्यवस्थापन करून त्यावर प्रक्रिया करणेसाठी मैला प्रक्रिया केंद्र (FSTP) बांधणे बाबत ग्लोबल एन्व्हिरोस,पनवेल,नवी मुंबई या एजन्सीस प्रकल्प विभागा कडून कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.सदर बाबत एकुण निविदा रक्कम रू.२४,९४,०९२/-इतकी असल्याने मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता घेवून कार्यारंभ आदेश देण्यात आला.मा.शासनाचे पत्र क्र.राअस/ODF++/६४५/१९-२० दिनांक ८ नोव्हेंबर २०१९ अन्वये देयक रू.२४,९४,०९२/- + जीएसटी १२ % रू.२,९९,२८१/- = २७,९३,२९४/- इतक्या खर्चाच्या केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतच्या ऑफिस रिपोर्टस मान्यता देण्यात येत आहे,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.सौ.आशा कराळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र.९**

विषय क्रमांक- १४९ गुरूवार दि.०६/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर पाणीपटटीचे दरात वाढ करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

विषयांकित बाबत विनंती रिपोर्ट सादर की, पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याचा दृष्टीकोनातून पाणीपटटी दरवाढ आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रकीय मा. महासभेसमोर पाणीपटटीचे दरात वाढ करणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रास्तावापैकी व्यावसायिक वापर व औदयोगीक वापराच्या पाणीपट्टीमध्ये प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार वाढ करण्यात यावी असा ठराव पारीत झ ालेला होता.त्यानुसार घरगुती वापर पाणीपट्टी दरवाढ वगळता व्यावसायिक वापर,औदयोगिक वापर,इत्यादींचे पाणी दरामध्ये एप्रिल २०१६पासून दरवाढ लागू करण्यात आलेली आहे.

परंतु अहमदनगर महानगरपालिकेकडे घरगुती वापर पाणी ग्राहकांची संख्याच मोठया प्रमाणावर असल्याने घरगुती पाणी ग्राहक वगळून इतर पाणी ग्राहकांचे पाणी पट्टीमध्ये दर वाढ केल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नामधून जास्त फरक पडत नाही.

त्यासाठी घ्रागुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे करीता विषयांकीत बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशीने मा.महासभेसमोर चर्चेसाठी ठेवून तेथील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करएे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्येतसाठी सादर करण्यात आला असता मा.स्थायी समिती सभ क्र.७ विषय क्र.६७ दि.०६/०२/२०१८ अन्वये ठराव पारीत ठरावा नुसार घरगुती वापर नळ कनेक्शन करिता रू.१०००/- वाढ करण्यात यावी तसेच हद्दी बाहेरील नळ कनेक्शन करिता रक्कम रू.२०००/- वाढ करण्यात यावी.असा निर्णय झालेला आहे.

मा.स्थायी समितीने मंजूर केलेला घरगुती वापर पाणीपटटी वाढीचा ठराव महानगरपालिकेच्या सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पीय मा.महासभेसमोर चर्चेसाठी मा.स्थायी समितीकडून परस्पर पाठविण्यात आलेला होता. परंतू महासभेत सदर बाबत निर्णय झालेला नाही.

**मागील ५ वर्षात पाणीपटटी पासून मिळणारे उत्पन्न व खर्चाची आकडेवारी खालीलप्रमाणे..**

| वर्ष | उत्पन्न | खर्च | तोटा |
|---|---|---|---|
| २०१४-२०१५ | १००४.०० | २०१९.६७ | १०१५.६७ |
| २०१५-२०१६ | १०४८.०० | २२२५.८६ | ११७७.८६ |
| २०१६-२०१७ | १०४५.३९ | २०४१.०३ | ९९५.६४ |
| २०१७-२०१८ | १०५९.९० | २८२९.८७ | १७६९.९७ |
| २०१८-२०१९ | १७०४.७६ | ३२१७.३३ | १५१२.५७ |

सन २०१६-२०१७ पासून व्यावसायीक वापर व औद्योगिक वापर पाणीपटटी मध्ये दरवाढ लागू केलेली असतांनाही **महानगरपालिकेस रूपये १५१२.५७ लक्ष इतका तोटा होत आहे.**

तद्नंतर सन २०१९-२०२० पासून घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपटटीमध्ये दरवाढ लागू करणे करीता विषयांकित बाबतचा प्रस्ताव दि.१५/०१/२०१९ रोजी मंजूरीसाठी सादर केला असता **मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी या व्यतिरिक्त [प्रस्तावीत दरवाढ व्यतिरिक्त] दरवर्षी ७% (सात टक्के ) वाढ करणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा. महासभेसमोर निर्णयास्तव सादर करणेस दिलेल्या मंजूरी नुसार उक्त कामाची प्रस्तावना इकडील जा.क्र. १५७३ दि.१५/०२/२०१९ अन्वये मा.नगररसचिव यांचे कडेस सादर करण्यात आलेली होती. परंतु सदरचे प्रस्तावावर मा.स्थायी समिती अथवा मा. महासभेसमोर कुठल्याही प्रकारचा निर्णय न होता सदरचे प्रकरण / फाईल दि.२०/१२/२०१९ रोजी नगरसचिव कार्यालयाकडून पाणीपुरवठा विभागास परत करण्यात आलेले आहे.**

सदयस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता चालू वर्षी पाणीपटटीसह इतर करांचे अपेक्षीत वसुली होत नसल्याने महानगरपालिकेची शाश्वत उत्पन्न कमी होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. परिणामी शहर पाणी योजनेपोटी वीज वितरण कंपनीचे दर महिन्याची वीज बीले वेळेत अदा होत नसल्याने शहर पाणी पुरवठा योजनेची वीज बिले वेळेत भरणेस वारंवार अडचणी निर्माण होत आहे. वीज बीले वेळेत न भरली गेल्यास भविष्यात वीज कपातीचे संकट कायम आहे.अशा परिस्थितीत घरगुती वापर पाणीपटटीचे दरात वाढ करणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.

त्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेकडे घरगुती पाणी वापर ग्राहकांची असलेली संख्या त्यामधून सद्यस्थितीत मिळणारे उत्पन्न व प्रस्तावीत दर वाढ केल्यास त्यामधून मिळणारे उत्पन्न इत्यादी बाबींचे अवलोकन केले असता उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणात फरक पडणार आहे. तसे केले तरच पाणीपुरवठा योजना चालविणेसाठी लागणारा खर्च व त्यामधून मिळणारे उत्पन्न इत्यादींचा भविष्यात ताळमेळ बसविणे सुलभ होईल. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| वापर | मिळणारे उत्पन्न रूपये | प्रस्तावीत उत्पन्न रूपये |
|---|---|---|
| घरगुती वापर नळ कनेक्शन | ८३२४४००० | १६६४८०००० |
| व्यावसायिक नळ कनेक्शन | १२६१०००० | १२६१०००० |
| औद्योगिक वापर नळ कनेक्शन | ४००००० | ४००००० |
| हद्दीबाहेरील नळ कनेक्शन | ८७९००० | १७५८००० |
| मीटर वापर नळ कनेक्शन | २४४००००० | २७४००००० |
| पंचायत समिती / शासकीय टँकर द्वारे | ११५५२०० | ११५५२०० |
| पाणी विक्री जमा टँकर द्वारे पाणी तिक्री | १२००००० | १२००००० |
| एकुण रूपये | १२३८८८२०० | २११००३२०० |

यास्तव सन २०१६-२०१७ पासून व्यावसायीक वापर व औद्योगिक वापर पाणीपटटी मध्ये दरवाढ लागू केलेली असतांनाही महानगरपालिकेस रूपये १५१२.५७ लक्ष इतका तोटा होत असल्याने सन २०२०-२०२१ पासून घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपटटीमध्ये दरवाढ लागू करणे करीता विषयांकित बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशीने मा. महासभेसमोर चर्चेसाठी ठेवून तेथील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहील. / अ

तथापी आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

सोबत- एकूण नळ कनेक्शन संख्या, त्यामधून मिळणारे उत्पन्न , घरगुती नळ कनेक्शन मध्ये दरवाढ लागू लागू केल्यानंतर मिळणारे उत्पन्न व फरक इत्यादी बाबतचा सविस्तर तक्ता

येणेप्रमाणे शाखा अभियंता प्र.स.क्र.१, शाखा अभियंता प्र.स.क्र.२, शाखा अभियंता प्र.स.क्र.३ , शाखा अभियंता प्र.स.क्र.४ यांचा अहवाल असे.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेल्या घरगुती वापर यांचे पाणी वापर दरात १/२ इंची साठी रू.३०००/- , ३/४ इंची साठी रू.६०००/- व १ इंची साठी रूपये १०,०००/- असे प्रस्तावीत केले असुन त्यामुळे सन २०१८-२०१९ मध्ये झालेल्या तोटा रू.१५१२.५७ कोटी पैकी ८.३२ कोटी इतका तोटा प्रस्तावीत दर वाढी मुळे येवु शकतो त्यामुळे मनपा अधिनियम १९४९ मध्ये कलम ९९ नुसार कलम १२९ "अ" तरतुदी नुसार "अ" प्रमाणे मा.स्थायी समिती व महासभेच्या मंजुरीसाठी सादर करता येईल.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, सन २०२०-२०२१ पासून घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपटटी मध्ये पृष्ठ क्र.P-२ वर प्रस्तावीत केल्यानुसार

१/२" - रूपये १५००/- मध्ये वाढ करून रूपये ३०००/-

३/४" - रूपये ३०००/- मध्ये वाढ करून रूपये ६०००/-

१" - रूपये ६०००/- मध्ये वाढ करून रूपये १००००/-

हद्दीबाहेरील घरगुती वापर १/२" रू. ३०००/- मध्ये वाढ करून रूपये ६०००/- मीटर द्ववारे घरगुती वापर प्रति हजार लिटर रू.१०/- मध्ये वाढ करून रू.२०/- प्रति हजार लिटर व शहरातील रू.५/- वरून १० रूपये याप्रमाणे वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशीनुसार मा.महासभेसमोर सादर करण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

****

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर पाणीपटटीचे दरात वाढ करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.आशा कराळे :- सर्व भागामध्ये योग्य दाबाने पाणी पुरवठा हो नाही.ज्या वेळी सर्व भागामध्ये योग्य दाबाने पाणी पुरवठा केल्या नंतर पाणीपट्टी दरामध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट बाबत सविस्तर माहिती सांगा

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- ऑफिस रिपोर्टचे सभागृहामध्ये वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- नगर शहरामध्ये सध्या किती कनेक्शन आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- शहरामध्ये सध्या ५४०००/- नळ कनेक्शन आहेत.

मा.सभापती साहेब :- बोगस कनेक्शन किती असू शकतात.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- मागील वर्षी सहा हजार बोगस नळ कनेक्शन रेग्युलाईज केले आहेत.

मा.श्री.सुभाष लोंढे :- कल्याण रोडची पाण्याची टाकी होवून १८ वर्ष झाली ,अदयापपर्यत टाकी भरत नाही.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- आवश्यक असलेले पाणी मिळत नसल्याने टाक्या भरत नाही.

मा.श्री.सुभाष लोंढे :- कल्याण रोड भागामध्ये पाच ते सहा दिवसांनंतर एकदाच पाणी पुरवठा होते.पाणी पुरवठा सुरळीत करा,योग्य दाबाने पाणी दया,मगच पाणीपट्टी वाढवा.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- दरवर्षी पाटबंधारे विभाग (रॉ वॉटर) पाण्याच्या दरामध्ये वाढ करते.

मा.सभापती साहेब :- पाणीपट्टी मध्ये वाढ होणे आवश्यक आहे.परंतु एकदम दप्पट करणे योग्य होणार नाही.टप्या टप्याने वाढ करणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- काहि नगरपालिका व महानगरपालिकेच्या पाणीपट्टी दराची माहिती माझ्या कडे आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- पाणीपट्टी दरामध्ये वाढ करण्यात बाबत कोणचेही दुमत नाही,पाणीपट्टी दरामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. परंतु फेज -२ चे काम का होत नाही.नागरीकांना योग्य प्रमाणात पाणी मिळते का? फक्त लाईन टाकण्यात आल्या आहेत.केव्हा पाणी देणार.

मा.श्री.सुभाष लोंढे :- टाकण्यात आलेल्या लाईन केव्हा जोडणार ते सांगा.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभागाचे जमा व खर्च बाजुचे किती हेड आहेत ते सांगा.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- पाणी पुरवठया करीता ३२ कोटींचा खर्च येतो.

मा.सभापती साहेब :- या विभागाने शुन्य अर्थसंकल्पाची (० बजेट) संकल्पना राबवली पाहिजे.पाणीपुरवठया करीता खर्च आपल्याला कमी करता येईल का? या खर्चावर आपण मर्यादा आणू शकतो का ?

मेकॅनिकल इंजी श्री.निकम :- आपला जर ३० कोटी रूपये खर्च येत असेल तर त्यातील २७ कोटी खर्च लाईट बील व शध्दीकरणावर होतो.मेंटनन्सवर जास्तीत जास्त १ कोटी पर्यत होतो.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७ मधील १ ब वाचून दाखवा.

प्र.नगरसचिव श्री.तडवी यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७ मधील १ ब वाचून दाखविण्यात आले.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७ मधील १ ब नुसार शसनाकडे वाहन कराचे लाखे रूपये जमा होतात.ते वरील कलमानुसार मनपाच्या हक्कचे आहेत.तसेच कलम १२७/२ क नुसार काही कर जमा हावू शकतो यातुन तोटा कमी होवू शकतो.आपण वाहन कर गोळा करतो का?मा.शासन वाहन कर वसूल करते.वाहन कर आपण का वाहनांवर लावत नाही.वाहनांवर कर लावण्याचा पहिला हक्क आपला आहे.जिल्हा परिषदे प्रमाणे आपल्याला सुध्दा संपूर्ण अनुदान मिळाले पाहिजे.या बाबत संपुर्ण अभ्यास करून प्रस्ताव ठेवता येत असेल तर पहा.या विषया संदर्भात दिनांक ०५/०२/२०२० रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष अहमदनगर शहर कौन्सिल यांनी सुध्दा माझयाकडे निवेदन दिले आहे.या निवेदनाचे वाचन करावे.

त्यानुसार सभेमध्ये दिलेल्या निवेदनाचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- पाणीपुरवठा फेज - २ चे काम केव्हा पूर्ण होईल.फेज -२ नुसार केव्हा पाणी मिळेल.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- मागील तीन वर्षा पासून फेज-२ चे पाणी मिळत आहे.

मा.सभापती साहेब :- फेज - २ चे काम पुर्ण होईपर्यत पाणीपट्टी मध्ये वाढ करणे योग्य होणार नाही.पाणीपट्टी मध्ये दुप्पट वाढ करणे चूकीचे आहे.मुळात पाणी सर्व भागामध्ये आवश्यकतेप्रमाणे येत नाही.काही ठिकाणी पाच -सहा दिवसांतुन एकदा पाणी येते.काही भागामध्ये अपुरा पाणीपुरवठा होतो.फेज -२ चे काम पुर्ण होईपर्यत संपुर्ण प्रस्तावित वाढ करता येणे योग्य नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- पाणीपट्टीमध्ये १०% वाढ करावी.फेज-२ चे काम झाल्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत योग्य दाबाने झाल्यानंतर पाणी पट्टीमध्ये प्रस्तावित करण्यात आलेली पाणीपट्टी मध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अनाधिकृत नळकनेक्शनची मोहिम राबविण्यात यावी.बोगस नळ कनेक्शन मोठया प्रमाणात आहेत.याचा शोध घेतल्यास उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे.

मा.श्री.सुभाष लोंढे :- शहराच्या मध्य भागातील पाण्याच्या लाईन अत्यंत जुन्या झालेल्या असल्याने मोठया प्रमाणात लिकेज होत आहेत.या पाईपलाईन बदलण्यात याव्यात.यामुळे पाणी वाया जाणार नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- समर्थ नगर येथील पाण्याची टाकी तयार होवून बरेच वर्ष झाली आजपर्यत टाकी भरलेली नाही.ही टाकी पुर्ण भरा.

मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- उदयाच टेस्टींग घेता येईल.

मा.श्री.गणेश भोसले :- पाणीपट्टी मध्ये १०% वाढ करा.ज्या दिवशी फेज-२ चे काम पुर्ण होवून नागरीकांना पुर्ण क्षमतेने योग्य दाबाने पाणीपुरवठा होईल त्या दिवशी पाणीपट्टी वाढी करीता सभा घेवून लगेच वाढ करू.

मा.सभापती साहेब :- पाणीपट्टी मध्ये सध्या असलेल्या रकमेमध्ये १०% वाढ करण्यात येत आहे.ज्यावेळी फेज-२ चे काम झाल्यानंतर संपुर्ण शहरामध्ये योग्य दाबाने मुबलक पाणीपुरवठा होईल त्यानंतर पाणीपट्टी मध्ये प्रस्तावीत केलेली पाणीपट्टी वाढ करण्यात येईल.कालच नगरसचिव कार्यालयाकडे मार्केट विभागाकडील कर दर वाढी बाबत व अंबिका वाचनालय ,केडगांव उप कार्यालय दर वाढी बाबत चा प्रस्ताव प्रसिध्दी विभागाकडून प्राप्त झाला आहे.महानगरपालिकेचे उत्पन्नवाढीच्या दृष्टीने सदर प्रस्ताव विषय पत्रीकेवर नसतील तरी याच सभेमध्ये विचारविनमया करीत घेण्यात येत आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- प्राप्त झालेल्या प्रस्तावांची माहिती सांगा

मार्केट विभाग प्रमुख श्री.वखारे :- विषय :- रस्ताबाजू मांडणी फी व स्लॉटर व गाळा भाडे कर दर वाढीबाबत

संदर्भ :- दि.२१/१२/२०१९ ची दर कर वाढीबाबत बैठक

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की,अहमदनगर मनपाच्या मार्केट विभागाकडील रस्ताबाजु मांडणी फी ५x४ =२० चौ.फुट करीता रक्कम रू.१०/- व त्यापुढील प्रती चौ.फुटास रक्कम रू.०.५०पैसे अकौंट कोड नं४१ नियम ७३(१) अन्वये वसुल करण्यात येतआहे.तसेच स्लॉटर फी प्रती बकरा - बकरी ,मेंढा-मेंढी रूपये ५/-वसुल करण्यात येत आहे.तसेच रात्रीच्या बाजारातील (कापड बाजार व मनपा हद्दीत) पावती रक्कम रू.१५/- प्रती विक्रेत्याची आहे.सदरच्या रकमा खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार वाढविल्यास मनपाचे उत्पन्नात दुपटीने भर पडेल असे विभागाचे मत आहे.

| अ.क्र | सध्याचा दर | रक्कम | वाढीव दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | रस्ता बाजू फी ५x४ =२० चौ.फुट त्यापुढील प्रती चौ.फुट दर | १०/-<br>०.५० | रस्ता बाजू फी ५x४ =२० चौ.फुट त्यापुढील प्रती चौ.फुट दर | २०/-<br>१.०० |
| २ | स्लॉटर फी<br>प्रती बकरा -बकरी,मेंढा -मेंढी | ५/- | स्लॉटर फी<br>प्रती बकरा -बकरी,मेंढा -मेंढी | १०/- |
| ३ | रात्रीची रस्ताबाजु फी प्रती विक्रेता | १५/- | रात्रीची रस्ताबाजु फी प्रती विक्रेता | ३०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | गाळा,हॉल,शाळा वर्ग खोल्या ,खुल्या जागा व्यायाम शाळा इ. | मा.नगररचनाकार यांने निश्चीत केलेल्या प्रति चौ.मी.दरानुसार वसुली केली जाते | गाळा,हॉल,शाळा वर्ग खोल्या ,खुल्या जागा व्यायाम शाळा,मंगल कार्यालय,पे ॲन्ड पार्क ,इत्यादी | मा.शसनाचे दि.१३/९/२०१९ चे पत्रान्वये मनपाने ज्या ज्या ठिकाणी जागा भाडे पट्याने दिलेल्या आहेत त्यांचे भाडे प्रती चौ.मी.प्रमाणे प्रमाणित करून घेणेबाबत मा.जिल्हाधिकारी अ.नगर मा.आयुक्त अहमदनगर मनपा मा.सहाय्यक जिल्हा निबंधक (मुद्रांक) अहमदनगर यांची समिती गठीत केलेली आहे.त्यानुसार मा.सहाय्यक जिल्हा निबंधक (मुद्रांक) अहमदगनर यांना जा.क्र.मार्केट विभाग ४४७ दि.१२/१२/२०१९ जा.क्र.४७५ दि.२१/१२/२०१९ अन्वये प्रती चौ.मी.दर ठरविणेबाबत कळविले आहे.सदरचे दर निश्चत झाल्यानंतर त्यानुसार भाडे आकारणी करणेस मान्यतेस्तव सादर. |

**पे ॲण्ड पार्क**

| अ.क्र. | पार्किगचे तास | दुचाकी वाहनधारकांकडून वसूल करावयाचे शुल्क | चार चाकी वाहनधारकांकडून वसुल करावयाचे शुल्क | पार्कीगचे तास | दुचाकी वाहनधारकांडून वसुल करावयाचे शुक्ल | चार चाकी वाहनधारकांकडून वसुल करावयाचे शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० ते २ तास | रू.५/- | रू.२०/- | ०ते२तास | रू.१०/- | रू.४०/- |
| २ | २ते ५तास | रू.८/- | रू.२५/- | २ते ५तास | रू.१५/- | रू.५०/- |
| ३ | ५ते ७ तास | रू.१०/- | रू.३०/- | ५ते ७ तास | रू.२०/- | रू.६०/- |
| ४ | ७ ते १० तास | रू.१५/- | रू.४०/- | ७ ते १० तास | रू.३०/- | रू.८०/- |
| ५ | १० तासांपेक्षा जास्त | रू.२५/- | रू.५०/- | १० तासांपेक्षा जास्त | रू.५०/- | रू.१००/- |

वरील तक्यात नमुद केल्यानुसार कर दर वाढ करणे कामी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे घेणेबाबत रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर,असा प्रस्ताव मा.उपायुक्त (कर) यांच्याकडे सादर केला असता प्रस्तववित केलेल्या दर वाढीस मा.स्थायी समितीची मान्यता मिळण्याकामी शिफारस करणे उचित हाईल असा अभिप्राय दिलेला आहे व त्यास मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे घेण्याबाबत सविनय सादर.

तसेच प्रसिध्दी अधिकारी यांनी सभेमध्ये केडगांव येथील अहमदनगर महानगरपालिकेचे अंबिका वाचनालय सदयस्थितीत वाचनांकडून मासिक वर्गणी रू.१०/- प्रति माह घेण्यात येते सदरची मासिक वर्गणी ही गेल्या अनेक वर्षापासून तेवढीच आहे.त्यामध्ये वाढ करणे आवश्यक असल्याने सदरची मासिक वर्गनी रू.१०/- ऐवजी रूपये ३०/- प्रतिमहा करणेबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला असता त्यावर मा.उपायुक्त (कर) यांनी "मनपाच्या महावीर वाचनालयाची फी रू.३०/- महिना आहे त्यानुसार उपरोक्त अ मधील अंबिका वाचनालयाची फी सुध्दा रू.३०/- महिना ठेवणे उचित होईल" असा अभिप्राय दिलेला आहे.यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांनी "दोन्ही वाचनालयाची फीस रू.५०/- रू महिना एप्रिल २०२० पासून करणे योग्य राहिल" असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी सदरचा विषय मा.स्थायी समितीपुढे मंजूरीस्तव व निर्णयास्तव सादर.

मा.श्री.गणेश भोसले :- खुल्या जागा देणे करीता समिती गठीत केली आहे.कोण सदस्य आहेत या समिती मध्ये

मार्केट विभाग प्रमुख श्री.वखारे :- गाळा हॉल शाळा वर्ग खोल्या खुल्या जागा व्यायाम शाळा इ.जागा भाडे पट्याने दिलेल्या आहेत त्या ठिकाणी प्रति चौ.मी.प्रमाणे प्रमाणित करून घेणे बाबत मा.जिल्हाधिकारी अ.नगर,मा.आयुक्त ,अहमदनगर मनपा,मा.सहाय्यक जिल्हा निबंधक (मुदांक ) यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

मा.गणेश भोसले :- समितीने किती भाडे वाढ सुचविली आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.वखारे : समितीची बेठक अदयाप झालेली नाही लवकरच होणार आहे.त्यामध्ये निर्णय होईल.

मा.श्री.गणेश भोसले :- पाणीपट्टी मध्ये १०% वाढ करा.ज्या दिवशी फेज-२ चे काम पुर्ण होवून नागरीकांना पुर्ण क्षमतेने योग्य दाबाने पाणीपुरवठा होईल त्या दिवशी पाणीपट्टी वाढी करीता सभा घेवून लगेच वाढ करू. मार्केट विभागच्या प्रस्तावातील ज्या ज्या ठिकाणी जागा भाडे पट्याने दिल्या आहेत त्यांचे भाडे मा.शासन निर्णया नुसार गठीत समितीची बेठकीमध्ये जो निर्णय होईल त्यानंतर प्रस्ताव ठेवा, सध्या रस्ता बाजू फि,स्लॉटर फि प्रस्तावित केलेल्या दरांच्या वाढीस मान्यता देण्यात यावी.व अंबिका वाचनालय व महावीर वाचनालयाची फी रू.५०/- प्रति महिना करण्यात यावी.

मा.सौ. सुवर्णा जाधव :- पाणीपट्टी मध्ये सध्याच्या घरगुती दरामध्ये १० %वाढ करण्यात यावी.व रस्ताबाजु फि,स्लॉटर फि मध्ये प्रस्तावानुार वाढ करण्यात यावी. वाचनालयाचे प्रस्तावित केलेले दरमहा रू.५०/- प्रति महिना या दरांस मान्यात देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर पाणीपटटीचे दरात वाढ करणेबाबतचा ऑफिस रिपोर्टवर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार घरगुती पाणीपट्टी मध्ये सध्या असलेल्या दरामध्ये १०% वाढ करण्यात येत आहे.ज्यावेळी फेज-२ चे काम पुर्ण झाल्यानंतर संपुर्ण शहरामध्ये योग्य दाबाने मुबलक पाणीपुरवठा होईल त्यानंतर पाणीपट्टी मध्ये प्रस्तावीत केलेली पाणीपट्टी वाढ करण्यात येईल.

सभेमध्ये मार्केट विभाग रस्ता बाजू मांडणी फी व स्लॉटर फी वसूली व गाळा भाडे कर दर वाढीबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार रस्ता बाजु फी व स्लॉटर फी

प्रस्तावीत केल्यानुसार मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

जागा भाडे दरा बाबत मा.शासन निर्णया नुसार गठीत केलेल्या समिती ने प्रमाणीत केलेल्या दरावर विचार विनिमय करणे करीता सविस्तर प्रस्ताव ठेवावा.

प्रसिध्दी विभागाने प्रस्तावित केलेला वाचनालय मासिक फी वाढविणेबाबच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

सर्व दर कर वाढीचे प्रस्ताव महासभेत निर्णयास्तव अखेर मंजूरी साठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर पाणीपटटीचे दरात वाढ करणेबाबतचा ऑफिस रिपोर्टवर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार घरगुती पाणीपट्टी मध्ये सध्या असलेल्या दरामध्ये १०% वाढ करण्यात येत आहे.ज्यावेळी फेज-२ चे काम पुर्ण झाल्यानंतर संपुर्ण शहरामध्ये योग्य दाबाने मुबलक पाणीपुरवठा होईल त्यानंतर पाणीपट्टी मध्ये प्रस्तावीत केलेली पाणीपट्टी वाढ करण्यात येईल.

सभेमध्ये मार्केट विभाग रस्ता बाजू मांडणी फी व स्लॉटर फी वसूली व गाळा भाडे कर दर वाढीबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार रस्ता बाजु फी व स्लॉटर फी प्रस्तावीत केल्यानुसार मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

जागा भाडे दरा बाबत मा.शासन निर्णया नुसार गठीत केलेल्या समिती ने प्रमाणीत केलेल्या दरावर विचार विनिमय करणे करीता सविस्तर प्रस्ताव ठेवावा.

प्रसिध्दी विभागाने प्रस्तावित केलेला वाचनालय मासिक फी वाढविणेबाबच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

वरील दर्शविल्याप्रमाणे दर करामध्यें वाढ करणेस मंजूरी देण्याची शिफारस करण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. सुवर्णा जाधव सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश भोसले सही/-

ठराव सार्वनुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका